**सन २०२६ च्या खरीप हंगामातील ३०४ दुष्काळी तालुक्यांमधील शेतकऱ्यांना रू. ५०००/- अग्रिम मदतीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग,**

**शासन निर्णय, क्रमांक:- समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई- ४०००३२

दिनांक:- २७ ऑक्टोंबर, २०२६

<u>वाचा</u>:- १) शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७ दि.०७ ऑक्टोबर, २०१७

२) शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/म-७, दि. २८ जून, २०१८

३) शासन निर्णय क्रमांक: समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. २२ सप्टेंबर, २०२६

४) शासन निर्णय क्रमांक: समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. २५ सप्टेंबर, २०२६

५) शासन निर्णय क्रमांक: समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. २९ सप्टेंबर, २०२६

६) शासन निर्णय क्रमांक: समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. ४ ऑक्टोंबर, २०२६

७) शासन निर्णय क्रमांक: समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. १४ ऑक्टोंबर, २०२६

**<u>प्रस्तावना:</u>**

दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ व २ अन्वये सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०२० मधील मार्गदर्शक सुचनांप्रमाणे खरीप २०२६ च्या हंगामातील परिस्थितीच्या आधारे संदर्भ क्र. ७ अन्वये राज्यातील ३०४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत.

सदर अंतिमत: जाहिर झालेल्या ३०४ दुष्काळी तालुक्यांमधील शेतकऱ्यांना शेत पिकाच्या झालेल्या नुकसानी बाबत द्यावयाची मदत व त्याचे स्वरूप अंतिम व्हावयाचे आहेत. राज्यातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना शेतपिकाच्या नुकसानी संदर्भात देण्यात येणाऱ्या मदतीचा पिक वर्गवारी निहाय व क्षेत्र निहाय तपशील यथावकाश अंतिम करण्यात येईल. दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिवाळीच्या अगोदर तातडीचा आर्थिक दिलासा देण्यासाठी ₹५,०००/- ची अग्रीम मदत थेट बँक खात्यात जमा करण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांनी केलेल्या घोषणेस दिनांक २७.१०.२०२६ रोजी पार पडलेल्या मा.मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे तसेच मा.मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने अशा दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना शेतपिकाच्या नुकसानी संदर्भात दिवाळी पुर्वी रुपये ५,०००/- इतकी मदत अग्रिम स्वरूपात देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्यातील दुष्काळ जाहिर झालेल्या ३०४ तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांच्या शेतपिकाच्या नुकसानी संदर्भात रु. ५०००/- अग्रिम मदत प्रति शेतकरी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यासाठी राज्यातील सुमारे १.५ कोटी दुष्काळ बाधीत शेतकऱ्यांना अग्रिम मदतीसाठी आवश्यक एकूण ७,५०० कोटी

इतकी रक्कम खर्च करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर अग्रिम मदत वाटपाचे निकष खालीलप्रमाणे राहतील.

१. दुष्काळी तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांच्या पिकांचे ३३ % पेक्षा जास्त नुकसान झाले आहे अशा सर्व शेतकऱ्यांना सरसकट अग्रिम मदत रू. ५०००/- वाटप करण्यात येईल.

२. राज्यातील ३०४ दुष्काळी तालुक्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना वरील अग्रीम मदत थेट डीबीटी व्दारे देण्यात येईल. दिनांक १.११.२०२५ ते आज रोजीपर्यंत ज्यांनी विविध शासकीय योजना अंतर्गत ई-केवायसी केली आहे त्यांची ई-केवायसी करण्याची आवश्यकता राहणार नाही.

३. ज्या वन पट्टाधारक शेतक-यांना अद्याप ॲग्रीस्टॅक शेतकरी ओळख क्रमांक मिळालेला नाही त्यांना ई-केवायसी आधारे अग्रीम मदत देण्यात येईल.

४. खालील गटातील शेतकऱ्यांना अग्रिम मदत अनुज्ञेय राहणार नाही.

i) महाराष्ट्र राज्यातील विद्यमान / भूतपूर्व मंत्री / राज्यमंत्री, विद्यमान / भूतपूर्व लोकसभा /राज्यसभा सदस्य, विद्यमान / भूतपूर्व विधानसभा / विधान परिषद सदस्य, जिल्हा परिषद /पंचायत समिती सदस्य आणि नागरी स्थानिक संस्थांचे सदस्य (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतचे नगरसेवक).

ii) केंद्र व राज्य शासनाचे सर्व अधिकारी / कर्मचारी (एकत्रित मासिक वेतन रुपये २५,०००/- पेक्षा जास्त असणाऱ्या व्यक्ती).

iii) राज्य सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (उदा. महावितरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, एस.टी. महामंडळ इ.) व अनुदानित संस्था यांचे अधिकारी व कर्मचारी. (एकत्रित मासिक वेतन रुपये २५,०००/- पेक्षा जास्त असणाऱ्या व्यक्ती).

iv) शेतीबाह्य उत्पन्नाच्या स्तोत्रातून आयकर भरणाऱ्या व्यक्ती.

v) निवृत्तीवेतनधारक व्यक्ती ज्यांचे मासिक निवृत्तीवेतन रुपये २५,०००/- पेक्षा जास्त आहे (माजी सैनिक वगळून).

vi) कृषि उत्पन्न बाजार समित्या, सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., सहकारी दूध संघ या संस्थांचे पदाधिकारी (अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळ), अधिकारी व कर्मचारी ज्यांचे एकत्रित वेतन रुपये २५,०००/- पेक्षा जास्त असणाऱ्या व्यक्ती तथापि, सहकारी साखर कारखान्यांचे हंगामी कामगार अग्रिम मदतीसाठी अपात्र असणार नाहीत.

**०२.** लाभार्थ्यांना मदत वाटपाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील जिल्ह्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा. या आदेशाव्दारे तसेच यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाव्दारे नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना दिलेल्या मदतीचा निधी बँकांनी कर्ज खात्यात अथवा अन्यथा वसुलीसाठी वळती करु नये याकरिता जिल्हाधिकारी यांनी सर्व बँकांना आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात. या सर्व सुचनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

**०३.** सदर निधीतून करण्यात येत असलेल्या खर्चाचे लेखे निधी आंहरित करण्यात येणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर ठेवण्यात यावे व करण्यात आलेल्या खर्चाचा कोषागार कार्यालये व महालेखापाल कार्यालयाशी त्रैमासिक ताळमेळ घेण्यात यावा. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून तसेच राज्य शासनाच्या निधीमधून उपलब्ध करून दिलेला उपरोक्त निधी खर्ची पडल्यानंतर तातडीने निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधितांकडून प्राप्त करून घेवून एकत्रितरित्या शासनास सादर करण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त यांची राहील.

**०४.** याबाबतची देयके अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांना सादर करण्याकरीता शासन निर्णय क्र. ओएफएम-१०/०७/प्र.क्र.२०२/ई, दिनांक १६.१०.२००७ अन्वये लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग यांना आहरण व संवितरण अधिकारी आणि वित्तीय सल्लागार तथा सह सचिव यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी सदर रक्कम कोषागारातून आहरित करून डीबीटी बँक खात्यात वर्ग करावी.

**०५.** वरील प्रयोजनासाठी होणारा खर्च मागणी क्रमांक सी-६, प्रधान लेखाशीर्ष - २२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१, अवर्षण (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च (९१) (०५) पीक नुकसानीमुळे शेतकऱ्यांना मदत (२२४५ २४३४), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ करिता उपलब्ध असलेली रू. २,००० कोटी अर्थसंकल्पीय तरतुद तसेच 'उणे प्राधिकार' द्वारे रू. ५,५०० कोटी अशी एकूण रू. ७,५०० कोटी तरतूद आर्थिक वर्ष सन २०२६-२७ मधून भागविण्यात यावा. सदर निधी कार्यासन मदत-३ मार्फत वितरीत करण्यात येईल.

**०६.** सदरचे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ५८८/२०२६/व्यय-९, दिनांक २१.१०.२०२६ तसेच दिनांक २७.१०.२०२६ रोजी झालेल्या मा.मंत्रिमंडळ बैठकीत मिळालेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०२७१८११२११३४१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SUNIL SAHADEV SAMANT
Date: 2026.10.27 18:12:35 +05'30'

**(सुनिल स. सामंत)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१)मा. राज्यपाल यांचे सचिव, मलबार हिल. मुंबई.

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह)) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा आणि युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) सर्व मा. लोकसभा सदस्य/राज्यसभा सदस्य (महाराष्ट्रातील).

६) सर्व मा. विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य.

७) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

८) मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुबई.

९) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०) अपर मुख्य सचिव, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

११) अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२) अपर मुख्य सचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई.

१३) अपर मुख्य सचिव, वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१४) प्रधान सचिव,सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई.

१५) प्रधान सचिव,जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६) सचिव,ग्रामविकास व पंचायत विभाग, मंत्रालय, मुंबई.

१७) सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई.

१८) सचिव, नियोजन विभाग (रोहयो), मंत्रालय, मुंबई.

१९) सचिव, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.

२०) सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई.

२१) सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.

२२) सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

२३) सर्व विभागीय आयुक्त.

२४) सर्व जिल्हाधिकारी.

२५) आयुक्त (कृषि), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२६) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

२७) महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

२८) सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी

२९) वित्त विभाग (व्यय-९/ अर्थसंकल्प/अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.

३०) सह सचिव तथा वित्तिय सल्लागार, मदत व पुनर्वसन विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई.

३१) कार्यासन क्रमांक मदत-१/मदत-३, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई.

३२) निवडनस्ती, (कार्यासन मदत-२).